## विशेष दिवाणी मुकदमा क्र.०८/२०13 मधील नि.क्र.११८ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर ताकीद व जाहिर ठरावाकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.८ हिने तिच्या विरुध्द दिनांक ०९.०३.२०१८ रोजी पारीत करणेत आलेला एकतर्फा आदेश रद्द बातल होवून मिळणेसाठी व तिची लेखी कैफियत अभिलेखात दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून तिची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.८ हिने अर्जाच्या पुष्ठयर्थ तिचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.११९ प्रमाणे दाखल केले आहे.

०२. प्रतिवादी क्र.८ असे कथन करते की, प्रतिवादी क्र. ८ हिस दावा समन्सची बजावणी झालेली आहे. तथपि, प्रतिवादी क्र. ८ ही दाव्याचे कामी हजर झालेले नाही. करीता, दिनांक ०९.०३.२०१८ रोजी नि.क्र.१ खालील आदेशाप्रमाणे प्रस्तुत प्रतिवादी क्र. ८ हिचे विरुध्द दावा एकतर्फा चालविणेबाबत आदेश झालेला आहे. वास्तविक पाहता प्रतिवादी क्र. ८ ही प्रतिवादी क्र. १ याची बहिण असून प्रतिवादी क्र. १, ४ ते ६ यांची बहिण आहे. सदरील प्रतिवादी ही परजिल्हयातील रहिवाशी आहे. सदरील दाव्याचे समन्स या प्रतिवादीस मिळालेनंतर तिने सर्व भावांजवळ दाव्याबाबत चौकशी केली असता, सदरचा दावा हा किरकोळ स्वरुपाचा असून यामध्ये तिला हजर होऊन म्हणणे देण्याची काहीही आवश्यकता नाही असे तिला समजले. यावर सदरील प्रतिवादीने विश्वास ठेवून दाव्यात स्वतःचे म्हणणे अगर कैफियत दाखल केली नव्हती. त्यामुळे तिच्या विरुध्द दावा एकतर्फा चालविणेचा आदेश पारीत झालेला आहे. दरम्यानचे काळामध्ये प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी हजर होऊन त्यांनी त्यांची कैफियत दिल्याची माहिती त्यांचेकडून समजली. काही काळानंतर प्रतिवादी क्र. ८ हिस प्रस्तुतचा दावा निकाली निघाला आहे, अशी माहिती समजली होती. त्याबाबतची खात्री सुध्दा या प्रतिवादीने केली नसल्याने प्रतिवादी क्र. ८ हिस दाव्याचे वस्तुस्थितीची माहिती मिळालेली नाही. त्यानंतर प्रतिवादी क्र. ८ हिने दाव्याची माहिती घेतली असता, प्रतिवादी क्र. ८ हिचे विरुध्द दावा एकतर्फा झाला असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे दिनांक ०९.०३.२०१८ रोजी प्रतिवादी क्र. ८ हिचे विरुध्द झालेला एकतर्फा दावा हा आदेश रद्द करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

०३. प्रतिवादी क्र. ८ पुढे असे कथन करते की, प्रतिवादी क्र. ८ हिने कैफियत

दाखल करणेस जाणून बुजून अगर मुद्दामहून विलंब केलेला नाही. सदरहू प्रतिवादी यांना त्यांची कैफियत दाखल करुन आपली बाजू मांडणेची संधी मिळणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. तसे न झालेस, प्रतिवादी क्र. ८ हिचे कशानेही न भरुन येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे. तसेच, दाव्याचा गुणवत्तेवर निकाल होणेस मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ८ यांचे विरुध्द झालेला दावा एकतर्फाचा आदेश रद्द होवून मिळावा, अशी प्रतिवादी क्र. ८ हिने विनंती केली आहे.

०४. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन न्यायाच्या दृष्टीकोनातून योग्य ते आदेश पारीत करणेत यावेत, अशी विनंती केली आहे.

०५. प्रस्तुत अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी क्र.८ यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणाचे अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र.८ हिने विहीत वेळेत तिचे लेखी म्हणणे / कैफियत अभिलेखावर दाखल केलेले नाही. तथापि, नक्कीच तिला तिची लेखी कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास, माझ्या मते, प्रतिवादी क्र.८ हिस तिची लेखी कैफियत अभिलेखात दाखल करणे शक्य ठरेल. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास वादींचे अपरिमीत असे नुकसान होईल अशी सुतराम शक्यता दिसून येत नाही. सदय स्थितीत प्रतिवादी क्र.८ हिचे विरुध्द पारीत करणेत आलेला दावा एकतर्फाचा आदेश रद्द करणे व तिला तिची कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खर्च रू.३००/- (रु. तिनशे फक्त) सह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.८ हिने उपरोक्त नमूद खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर दिनांक ०९.०३.२०१८ रोजी तिचे विरुध्द पारित करणेत आलेला दावा एकतर्फा चालविणेचा आदेश रद्द करण्यात येईल व तिने दाखल केलेली कैफियत/म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD

Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2025.12.19 11:06:57 +0530

दि.१७.१२.२०२५

(एस. पी. सय्यद)

२रे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर.वडूज.